**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**अधिसूचना**

क्र. १२५/२०१७ दिनांक ७.९.२०१७

**विषय : अधिसभा, विद्या परिषद आणि अभ्यास मंडळ निवडणूका-२०१७ नामनिर्देशन शुल्क निश्चितीबाबत.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ तील विविध तरतूदी अंतर्गत अधिसभा, विद्या परिषद आणि अभ्यास मंडळांच्या निवडणूका घेण्यात येणार आहे. एकरूप परिनियम क्र. १/२०१७ मधील तरतूदीनुसार निवडणूकीसाठी उभे राहू इच्छिणा-या उमेदवारांकडून नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी प्रत्येक नामनिर्देशनपत्रासोबत विद्यापीठाने विहित केलेले नामनिर्देशन शुल्क जोडणे आवश्यक आहे. निदेश क्र. ३४/२०१७ मधील परिच्छेद ४(सी) नुसार नामनिर्देशन शुल्क विहित करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना दिलेले आहेत.

सर्व संबंधितांच्या माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, सदहू निदेशान्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मा.कुलगुरूंनी रू. २००/- (रू. दोनशे फक्त) नामनिर्देशन शुल्क निश्चित केले आहे. सदर शुल्क हे रोखीने असल्यास विद्यापीठ पावतीद्वारे किंवा कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे नावे काढलेल्या धनाकर्षाद्वारे नामनिर्देशनपत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

स्वा/-<br>
(डॉ.अजय प्र. देशमुख)<br>
कुलसचिव<br>
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ